BRAP (Business Reform Action Plan) -२०२२ अंतर्गत DPIIT ( Department for Promotion of Industry and Internal Trade) यांनी सुचित केलेल्या सुधारणांवर कार्यवाही करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
**शासन निर्णय, क्र.अधिनि-०७२२/प्र.क्र.१३२/काम.७**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक - २६ सप्टेंबर, २०२२

**वाचा**:- १) कामगार आयुक्त, मुंबई यांचे क्र. क्र.काआ/BRAP/सुधारणा/२०२२/५१६/ कार्या.११, दि.१०.६.२०२२ चे पत्र
२) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.संकिर्ण-२०१५/प्र.क्र.१२/ कामगार ९, दि.२४.०७.२०१५.

**प्रस्तावना:-**

Business Reform Action Plan (BRAP) २०२२ अंतर्गत DPIIT यांनी सुचित केल्यानुसार कामगार आयुक्त, मुंबई यांनी दिनांक १०.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये "इमारत व इतर बांधकाम कामगार (कामगारांचे नियमन व शर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत आस्थापनांची नोंदणी प्रमाणपत्र" या संदर्भात "राज्य शासन ठरवेल अशा कालावधीनंतर अशी सेवा मान्य करण्यात आली आहे, असे ग्राहय धरण्यात येईल व त्यानुसार स्वयंनिर्मित (Auto Generated) नोंदणी/सुधारणा प्रमाणपत्र निर्गमित होणेबाबत संगणकीय प्रणालीमध्ये बदल करण्याचा " प्रस्ताव सादर केला आहे.

शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दिनांक २४.०७.२०१५ अन्वये "इमारत व इतर बांधकाम कामगार (कामगारांचे नियमन व शर्ती) अधिनियमन, १९९६ अंतर्गत आस्थापनांची नोंदणी प्रमाणपत्र" ही सेवा पुरविण्यासाठी ७ दिवसांचा कालावधी विहित केलेला आहे. या कालावधीमध्ये सदर सेवा पुरविली न गेल्यास स्वयंनिर्मित (Auto Generated) च्या माध्यमातून नोंदणी प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता संगणकीय प्रणालीमध्ये आवश्यक ते अनुषंगिक बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय:-**

शासन निर्णय, दिनांक २४.०७.२०१५ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत इमारत व इतर बांधकाम कामगार (नोकरीचे नियमन आणि शर्ती) अधिनियम, १९९६ मधील आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र सेवा पुरविण्यासाठी ७ दिवसांचा कालावधी विहित केलेला आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार (नोकरीचे नियमन आणि शर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत आस्थापना नोंदणी/सुधारणा प्रमाणपत्राकरीता परिपूर्ण अर्ज सादर केल्याच्या तारखेपासून कार्यालयीन सात दिवसांमध्ये नोंदणी/सुधारणा प्रमाणपत्र दिले गेले नसल्यास, अशा आस्थापनेची नोंदणी/प्रमाणपत्र सुधारणा करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल (Deemed Approval) आणि नोंदणी/सुधारणा प्रमाणपत्र इलेक्ट्रॉनिक स्वरुपात स्वयंचलितपणे (Auto Generated) निर्गमित

करता येईल, या अनुषंगाने संगणकीय प्रणालीमध्ये आवश्यक ते अनुषंगिक बदल करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

त्यानुसार कामगार आयुक्त, मुंबई यांनी त्यांचे स्तरावरुन संबंधित संगणकीय प्रणालीमध्ये आवश्यक ते अनुषंगिक बदल करण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

आस्थापना नोंदणी/सुधारणा प्रमाणपत्राबाबत Deemed Approval व सदर प्रमाणपत्र इलेक्ट्रॉनिक स्वरुपात स्वयंचलितपणे निर्गमित करणेबाबतची तरतूद करण्यात येत असली तरी आस्थापना नोंदणी/सुधारणा प्रमाणपत्राकरीता परिपूर्ण अर्ज सादर केल्याच्या तारखेपासून कार्यालयीन सात दिवसांमध्येच नोंदणी/सुधारणा प्रमाणपत्र दिले जाईल याची दक्षता संबंधित नोंदणी अधिकारी यांनी घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२२०९२६१८१०१५०९१० असा आहे. सदरचा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अशोक मांडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, O/C
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,
४. मा.विरोधी पक्ष नेता (विधानपरिषद/विधानसभा) यांचे खाजगी सचिव,
५. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक
६. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक,
७. कामगार आयुक्त, कामगार आयुक्तालय, कामगार भवन, सी-२०, ई ब्लॉक, वांद्रे- कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.
८. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, एमएमटीसी हाऊस, सी-२२, ई ब्लॉक, वांद्रे- कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.
९. सर्व अपर आयुक्त/उप आयुक्त (कामगार)/सहायक कामगार आयुक्त,
१०. निवड नस्ती (कामगार-७)